# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील कनिष्ठ न्यायालयाचे कामकाज मराठी भाषेतून चालविणेबाबत**

**(१) ३२५६ (१५-०१-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ न्यायालयाचे कामकाज मराठी भाषेतून चालावे म्हणून राज्य शासनाने दिनांक २१ जुलै, १९९८ रोजी अधिसुचना काढली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाची भाषा मराठी करण्यासाठी कायद्याची पुस्तके मराठीतून उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे त्यामुळे शासनाने इंग्रजी भाषेतील कायद्याची पुस्तके मराठी भाषांतर करुन देण्याचे आदेश राज्य शासनाला मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाची भाषा मराठी होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१५) :** (१) होय.

(२) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१८३/१४ श्री. शांताराम दातार विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर याप्रकरणी दि.२१.११.२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी केंद्र व राज्याअधिनियमांच्या प्राधिकृत (Authoritative Texts) मराठी अनुवादाबाबत शासन कोणती उपाययोजना करत आहे. याबाबतची माहिती देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने केंद्रीय कायद्यांच्या अनुवादाबाबतची सद्यस्थिती मा.उच्च न्यायालयासमोर शपथपत्राद्वारे सादर करण्यात आली आहे.

(३) शासन अधिसूचना दि. २१ जुलै,१९९८ च्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने दि.०९.१२.२००५ च्या परिपत्रकान्वये दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना ५०% कामकाज मराठीत करण्याबाबत निदेश दिलेले आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४८(२) नुसार मराठी ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा करण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील सर्व शिक्षकांचे पगार ऑनलाईन पद्धतीने काढण्याबाबत**

**(२) ५१८३ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शिक्षकांचे पगार वेळेवर व्हावे व कर्मचाऱ्यांना होणारा आर्थिक त्रास कमी व्हावा या हेतूने सर्व कर्मचाऱ्यांचे पगार ऑनलाईन पद्धतीने करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर ऑनलाईन पद्धतीमध्ये कौशल्यप्राप्त कर्मचारी नसल्याने अनेक तालुक्यामध्ये शिक्षकांचे पगार दोन ते तीन महिने उशिराने होत असल्याने त्यांना आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदरील कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर काढण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०८-२०१५) :**(१) होय

(२) हे खरे नाही.

(३) शिक्षकांचे वेतन हे शालार्थ प्रणालीद्वारे होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेणारे डॉक्टर दुर्गम भागात डॉक्टर सेवा करत नसल्याबाबत**

**(३) ५१८५ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक डॉक्टर शासकीय सेवेत येताना केलेला करार मोडून नोकरी सोडून जात असल्याचे तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेणारे डॉक्टर उत्तीर्ण झाल्यावर रू. २५ लाख ते १ कोटीपर्यंत दंड भरतात परंतु दुर्गम भागात डॉक्टर सेवा करीत नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा डॉक्टरांकरिता असलेल्या दंडाच्या किंवा बॉण्डच्या रकमेत १० पट वाढ करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अनेक डॉक्टर्स शासकीय सेवेचा फायदा घेऊन वेतनासोबत शासकीय सवलतीतून पदव्युतर शिक्षण घेत असून सवलती प्राप्त होताच नोकरी सोडण्याचे प्रकार करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१५)** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही परिसरात गडमौशी येथे क्रीडा संकुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४) ५४२८ (०९-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही परिसरात गडमौशी येथील गट नं. २८२ मधील चार हेक्टर जागेवर क्रीडा संकुलाचे अपूर्णावस्थेत बांधकाम करण्यात आले असून निधी अभावी फुटबॉल, व्हॉलीबॉल, हॉकी व बास्केटबॉल या खेळांची मैदाने तयार करण्यात आलेली नसून संरक्षण भिंतीसह पथदिव्याचे काम अद्यापही प्रलंबित असून सदरहू सर्व कामे तातडीने पुर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दयावा असे लोकप्रतिनिधींनी मा. क्रिडा मंत्री व प्रधान सचिव, शालेय व क्रिडा विभाग यांना निवेदनाद्वारे दिली असल्याची माहिती दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सिंदेवाही येथील क्रीडा संकुलाचे अपूर्णावस्थेत असलेले बांधकाम व इतर कामाकरीता आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०७-२०१५) :** (१) व (२) होय. अंशत: खरे आहे. तथापि तालुका क्रीडा संकुल, सिंदेवाही येथील बांधकामाकरीता मान्य निधी रु.१.०० कोटी पुर्णत: उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर प्राप्त निधीतून तालुका क्रीडा संकुल, सिंदेवाहीच्या जागेवर इनडोअर हॉलचे बांधकाम, विद्युत व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्था व काही भागातील जागेचे समपातळीकरण करण्यात आलेले आहे. याकरीता रु.४०.०० लक्ष खर्च करण्यात आलेले आहेत. सदर तालुका क्रीडा संकुल सिंदेवाहीच्या जागेवर सागवानासह इतर विविध जातीची झाडे असल्यामुळे वन विभागाच्या परवानगीने व त्यांच्यामार्फत झाडे काढण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत पुर्ण झालेले असून सदर जागेवर बास्केटबॉल कोर्टाचे बांधकाम व अंदाजे १५० मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील बॅडमिंटनच्या हॉलचे बांधकाम सुरु करण्याची केलेली मागणी**

**(५) ५६६७ (१९-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांकडून बॅडमिंटनच्या हॉलचे बांधकाम सुरु करण्याची मागणी झाल्याने दिनांक १३ सप्टेंबर, २०१३ रोजी शासनाने शहरामध्ये बॅटमिंटन हॉल बांधण्यासाठी २ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी दिला असतानाही क्रीडा अधिकारी व जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय नसल्यामुळे सदरील निधी तसाच शिल्लक राहिला असल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीचा विनियोग न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २६.३.२००१ च्या रु. ४००.०० लक्ष अधिक राहून जिल्हा क्रीडा संकुलाकरीता शासनाकडून रु.३,२९,१८,००० निधी मंजूर झाला होता. सदर बांधकामाला सन २००१ पासून सुरुवात होऊन सन २००५-०६ पर्यंत या योजनेतून खालील कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. (१) ४०० मी. धावनमार्ग (२) जलतरण तलाव (३) वसतीगृह (४) प्रेक्षागृह, संरक्षक भिंत, प्रवेशव्दार, स्क्वॅस हॉल व लॉन टेनिसची २ मैदाने इत्यादी कामे पूर्ण करण्यात आलेली आहे. यावर रु.२४७.८८ लक्ष खर्च झालेला आहे. वरील कामात बॅडमिंटन हॉलच्या बांधकामाचा त्यावेळी समावेश नव्हता. बॅडमिंटन हॉल कामासाठी रु.४११.५८ लक्ष किंमतीचे सुधारीत अंदाजपत्र सा.बां. विभागामार्फत तयार करुन राज्य क्रीडा विकास समितीची मान्यता घेण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुल समितीने प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास शासनाची मान्यता प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२), (३) व (४) सदर निधी मंजूर न झाल्यामुळे निधीचा विनियोग करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोहोळ व सांगोले (जि.सोलापूर) येथील अपूर्ण असलेल्या**
**क्रीडा संकूलांचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(६) ६०६५ (०९-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात अद्यापही क्रीडा संकुले बांधण्यात आलेली नसून या क्रीडा संकुलांसाठी शासनाकडून प्रत्येक वर्षी निधी प्राप्त होतो परंतु दरवेळी वेगवेगळी कारणे सांगून आलेला निधी परत पाठविला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सांगोले येथील तालूका क्रीडा संकुल बांधण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी, २००४ रोजी सांगोले नगरपालिकेने ४ हेक्टर ०८ आर जागा शासनाकडे दिली असुन सदरील नगरपालिकेने शासकीय निधीतून ५९.५९ लाख खर्च करुन मैदान सपाटीकरण, संरक्षण भिंत, पूरुष व महिलांसाठी जिमखाना इत्यादी कामे करुन सन २००५ च्या सुमारास तालूका जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ताबा दिलेला असताना अद्यापपर्यंत तालुका क्रीडा संकुलांचे पुढील काम बंद आहे व संकुलही बंद स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त क्रीडा संकुलांची कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त ठिकाणी त्वरीत क्रीडा संकुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) उक्त संकुलने साधारणत: केव्हापर्यंत खेळाडूंसाठी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) मोहोळ तालुका क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध न झाल्याने संकुलाचे काम सुरु झालेले नाही. नगरपरिषदेकडून प्राप्त झालेल्या जागेवर सांगोला तालुका क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर असून या संकुलासाठी मंजूर रु.१.०० कोटी निधीमधून रु.६३.०० लाख रुपयांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित निधी शिल्लक आहे. सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम पुर्ण होताच ते खेळाडूंना उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

### ठाणे येथील मौ.कळवा परिसरातील महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवर कम्युनिटी कॉलेज (community college) उभारण्याबाबत

**(७) ६९७९ (०८-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मौ.कळवा परिसरातील महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवर कम्युनिटी कॉलेज (Community College) उभारण्यास शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरू असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झाली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात फायदा होणार असल्याने सदर ठिकाणी कम्युनिटी कॉलेज सुरू करण्यासंदर्भात, सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०९-२०१५) :** (१) होय.

(२) जिल्हाधिकारी ठाणे यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना संबंधित जागेचा आगाऊ ताबा दिलेला आहे.

(३) कम्युनिटी कॉलेज सुरु करण्यासंदर्भात मुंबई विद्यापीठ मुंबई यांना परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**मुंबई विद्यापीठाच्या ठाणे, कल्याण व रत्नागिरी उपकेंद्रासाठी संचालकांची नियुक्ती करण्याबाबत**

**(८) ६९८४ (०८-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे, कल्याण व रत्नागिरी उपकेंद्रासाठी संचालकांची नियुक्ती करुन सदरची केंद्रे सुरु करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे ,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच मुंबई विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील सदरची उपकेंद्रे पूर्ण क्षमतेने सुरु करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) संचालक पदाची भरतीप्रक्रीया सुरु आहे.

(३) ठाणे उपकेंद्रामधील संचालक पद भरण्याकरिता दि.१४ जून,२०१४ रोजी जाहिरात देण्यात आली होती तथापि निवडसमितीने कोणाचीही शिफारस न केल्यामुळे नियुक्ती करण्यात आली नाही. आता पुन्हा संचालक पद भरण्याकरिता जाहिरात देण्याची कार्यवाही सुरु आहे. कल्याण उपकेंद्रा करिता जाहिरात देण्याची कार्यवाही सुरु आहे. रत्नागिरी येथे संचालकाचे पद मंजूर नाही.

---

**राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथीक डॉक्टर्सना शासन सेवेत घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याबाबत**

**(९) ६९९६ (०९-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथीक डॉक्टर्सना शासन सेवेत घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सर्वसामान्यांना वेळेत आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०७-२०१५) :** (१) होय.
(२) आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथिक डॉक्टरांकरिता वेगळे संचालनालय (सार्वजनिक सेवा) निर्माण करण्याबाबत व विविध ५४१ पदे निर्मितीबाबत या विभागांतील असलेल्या आयुष संचालनालयाचे पत्र दिनांक ०४.०४.२०१५ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागास विनंती करण्यात आलेली असून तद्नुसार कार्यवाही झाल्यास आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथिक डॉक्टरांना सामावून घेणे शक्य होईल.
(३) या विभागाच्या शासकीय आयुर्वेद रुग्णालयांत विविध आंतररुग्ण व बाह्यरुग्णांसाठी विभागामार्फत विविध सुविधा उपलब्ध केल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जागतिक, आशियाई, ऑलिम्पिक व इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरीता देण्यात आलेला निधी खर्च न झाल्याबाबत**

**(१०) ७८१४ (१९-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक, आशियाई, ऑलिम्पिक व इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करावी यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी शासनाने सुमारे पाच लाख रुपये सहाय्य देण्यासाठी ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१३ रोजी घेऊन सन २०१२-१३ मध्ये या योजनेसाठी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी विहित वेळेत न झाल्यामुळे निधीची मुदतच उलटून गेल्यामुळे ४० लाख रुपयांची रक्कम पुन्हा कोषागारात भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेची प्रक्रिया वेळत पूर्ण करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, संबंधित व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४), व (५) सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त खेळाडूंना देण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व जिल्हयातील पात्र खेळाडूंचे प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना

क्रीडा संचालनालय, पुणे यांच्याकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन त्यामधील त्रुटी पुर्तता करुन अंतिम प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्यात आलेली नाही.

---

### रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमधील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(११) ७९७४ (०९-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमधील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीतर्फे लाक्षणिक उपोषण करण्यात आले असून यासंदर्भात महाड तालुका शाखेच्यावतीने लेखी निवेदनाद्वारे महाड पंचायत समिती कार्यालयात देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रलंबित मागण्यांबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) होय.

(२) महाड तालुक्यातील सन २००६ मध्ये चट्टोपाध्याय वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर झालेल्या ९९ प्राथमिक शिक्षकांना फरकाची बीले अदा करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. सदर बीले विविध प्रकारच्या त्रुटींमुळे प्रलंबित असून सदर त्रुटींची पूर्तता करुन बीले अदा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शैक्षणिक संस्थांच्या आवारात व विद्यापीठात तंबाखू बंदीचे फलक लावण्याबाबत

**(१२) ८१०९ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम सहाची अंमलबजावणी करण्याचे मा.उच्च न्यायालयाने राज्याच्या उच्च शिक्षण विभागाला देऊन शैक्षणिक संस्थांच्या आवारात व विद्यापीठात तंबाखू बंदीचे फलक लावण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात शाळा व महाविद्यालयाच्या परिसरात छुप्या पद्धतीने गुटख्याची विक्री होत असून पान मसाला व सुगंधीत तंबाखूचे पाऊच एकत्र करुन विकले जात असल्याचे माहे मार्च, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने अंमलबजावणी सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व शैक्षणिक संस्थांच्या आवारात व विद्यापीठात तंबाखू बंदीचे फलक लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) शासनाच्या दिनांक २२/०२/२०११ च्या परिपत्रकान्वये शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तंबाखु नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी शाळांमध्ये करण्याबाबत शालेय विभागाच्या दिनांक २२/०४/२०१४ च्या पत्रान्वये तसेच ०७/०७/२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व महाविद्यालये व विद्यापीठे यांना दिनांक ०७/०३/२०१५ प दिनांक २४/०६/२०१५ च्या परिपत्रकान्वये तंबाखू नियंत्रण कायद्याची अंमलबाजावणी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

---

**मुंबईतील शाळांमध्ये मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर**
**कर्मचारी नियमबाह्यपणे कार्यरत असल्याबाबत**

**(१३) ८४४४ (०९-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कॅथेड्रल शाळेसह दि बॉम्बे सेंट मेरीज सोसायटी (आयसीएसई), ॲक्टिव्हिटी हायस्कूल, डायमंड ज्युबिली हायस्कूल, बॉम्बे स्कॉटिश हायस्कूल या शाळामध्ये ५८ वर्षापेक्षा जास्त वय असलेले मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियमबाह्यपणे कार्यरत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय. असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त नियमबाह्यपणे कार्यरत असलेल्या मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१७-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून संबंधित शाळांना नोटीस देण्यात आली आहे. ज्या शाळांनी शासन आदेशाचे पालन केले नाही. त्या शाळांचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत शिक्षण संचालक, पुणे कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई पोलीस विभागाकडून पृथ्वीराज फडतरे या खेळाडूस प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यास दिरंगाई केल्याने नोकरी गमवावी लागल्याबाबत**

**(१४) ८५५९ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलीस विभागाकडून पृथ्वीराज फडतरे या खेळाडूस नेमणूकीचे पत्र मिळालेले असतानाही क्रीडा संचालनालयाने प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यास दिरंगाई केल्याने खेळाडू प्रवर्गातून मिळालेली नोकरी गमवावी लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० डिसेंबर, २०१० मध्ये नेमणूक पत्र मिळूनही प्रमाणपत्रे माहे जुलै, २०११ मध्ये पडताळणीस पाठविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब (१) व (२) बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व (२) नवी मुंबई पोलीस विभागाकडून माहे डिसेंबर,२०१० मध्ये श्री पृथ्वीराज फडतरे यांचे खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीचे प्रकरण संचालनालयास प्राप्त झाले. या अनुषंगाने दिनांक २० एप्रिल, २०११ रोजी अहवाल पोलीस आयुक्त, नवी मुंबई पाठविण्यात आला.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एकूण सात संस्थांमध्ये विविध वैद्यकीय नर्सिंगविषयक अभ्यासक्रम अनधिकृतपणे चालविले जात असल्याबाबत**

**(१५) ८७०२ (०९-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण सात संस्थांमध्ये विविध वैद्यकीय नर्सिंगविषयक अभ्यासक्रम अनधिकृतपणे चालविले जात असल्याची तक्रार फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन या स्वयंसेवी संस्थेने माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये राज्याच्या वैद्यकिय शिक्षण विभागाकडे दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सात संस्था कोणकोणत्या आहेत व या तक्रारीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदरहू सात संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२४-०८-२०१५) :** (१) सदर तक्रार आढळून येत नाही.
(२ प्रश्न उद्‍भवत नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**केंद्र व राज्य शासनामार्फत चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम न दिल्याबाबत**

**(१६) ९३०८ (०९-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनामार्फत चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत असतांना पात्र ठरुन दोन वर्षे झाली तरी कोल्हापूर शहरातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम जमा न झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम त्वरीत देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०८-२०१५) :** (१) (२) व (३) राज्यात चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती बँकांमार्फत शिष्यवृत्तीधारकांच्या बँक खात्यावर सन २०१०-११ पासून संचालनालय स्तरावरुन जमा केली जाते.

सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये ज्या पात्र शिष्यवृत्तीधारकांच्या बँक खात्याची माहिती परिपूर्ण आहे अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

---

**राज्यात शाळेत भौतिक सुविधा व शाळेच्या इतर खर्चाकरीता वेतनेतर अनुदान व इमारत भाडे पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(१७) ९७९६ (०९-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळेत भौतिक सुविधा आणि शाळेच्या इतर खर्चाकरीता सन २००४ पूर्वी शासनाकडून वेतनेतर अनुदान व इमारत भाडे मिळत होते सदरील भाडे सन २००४ नंतर पूर्णत: बंद करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतनेत्तर अनुदान इमारत भाडे बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार उक्त वेतनेत्तर अनुदान इमारत भाडे तत्काळ सुरू करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०५-२०१५) :** (१) नाही. शासन निर्णय दि.१९/०१/२०१३ अन्वये वेतनेत्तर अनुदान सुरु करण्यात आलेले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**क्रीडा विभागाच्या व्यायाम शाळेला आतापर्यंत दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(१८) १०४२२ (१९-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रत्येक व्यायामशाळेला आतापर्यंत दिल्या जाणाऱ्या अनुदानात २ लक्ष ऐवढी वाढ करुन ७ लक्ष रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलडाणा जिल्ह्यात सन २०१५ मध्ये बऱ्याच संस्थेकडून व्यायामशाळेसाठी साहित्यसंदर्भात अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असतानाही जिल्हा वार्षिक नियोजन समिती, बुलढाणा यांचेकडून जिल्हा क्रीडा विभागाला मर्यादित निधीची तरतूद करण्यात येत असल्यामुळे प्रत्यक्षात अनुदानाची वाढ होवूनही संस्थेला वाढीव अनुदान देता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा वार्षिक नियोजन समिती, बुलढाणा यांचेकडून जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांना वाढीव निधीची तरतूद करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, उक्त वाढीव निधीची तरतूद किती कालावधीत देणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व्यायामशाळा विकास अनुदान योजनेत शासन निर्णय क्र. क्रीडायो ३११३/प्र.क्र.३९/क्रीयुसे-३,दि.२२.०१.२०१४ अन्वये शासन अनुदानाची मर्यादा बांधकामाकरिता व व्यायाम साहित्य देण्याच्या जिल्हास्तरीय योजनेची अनुदान मर्यादा वाढविण्यात आलेली असून ती रु.२.०० लक्षापासून रु ७.०० लक्षापर्यंत वाढविण्यात आलेली आहे.
(२) दि. २२ जानेवारी,२०१४ चा सुधारित शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावांस अनुदान मर्यादा रु २.०० लाख याप्रमाणे मंजूरी देण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांना सुधारित शासन निर्णयानुसार अनुदान मर्यादेत रु. ७.०० लाख वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार संस्थांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात बांधकामासाठी रु. १९०.०० लक्ष व साहित्यासाठी रु.२००.०० लक्ष अशी एकूण रु. ३९०.०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पारनेर येथील क्रीडा संकूलाच्या विकास कामांसाठी दिलेल्या निधीतून विद्युतीकरणाचे काम करण्याबाबत

**(१९) १०५४८ (०९-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहमदनगर) येथील क्रीडा संकुलाच्या विकास कामासाठी शासनाने अतिरिक्त १५ लाखांचा निधी माहे जानेवारी, २०१४ मध्ये उपलब्ध करून दिला असतानाही सदर निधीमधून उक्त क्रीडांगणाचे विद्युतीकरणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामाचा पाठपुरावा करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना उपोषणाची नोटीस दयावी लागली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबधित दोषींवर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच सदर क्रीडांगणाचे विद्युतीकरणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही. तालुका क्रीडा संकुल पारनेरकरिता शासनामार्फत दि. ३०.०३.२०१३ पर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण रु. ६०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) तालुका, क्रीडा संकुलाच्या दि.३०/०१/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार तालुका क्रीडा संकुल समिती,पारनेरच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग यांना कामाचे आदेश व धनादेश देण्यात आला. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, अहमदपगर यांनी दि. २० फेब्रुवारी,२०१५ रोजी विद्युतीकरणाचे काम पूर्ण केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रत्येक शाळा व महाविद्यालयामध्येही महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(२०) १०८७७ (०९-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांवर होणारे अन्याय रोखण्यासाठी प्रत्येक शाळा व महाविद्यालयामध्येही महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय शासनातर्फे घेण्यात आलेला असून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे माहे जानेवारी, २०१५ मध्ये देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांवर होणा-या अत्याचाराचे प्रमाण रोखण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने प्रत्येक ठिकाणी महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याच्या शिफारसी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) हे, खरे आहे.

(२) हे, खरे आहे.

(३) व (४) राज्यातील सर्व शाळांमध्ये महिलांकरिता तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा (जिल्हा/विभागीय/राज्य स्तरावर) घेण्यात येत आहे.

---

## सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालयात औषध उपलब्ध नसल्याबाबत

**(२१) १०९५८ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालयात विविध आजारांवर उपचार होऊन प्रकारची औषधेही मोफत दिली जातात परंतू आता बऱ्याच आजारावरील औषध उपलब्ध नाहीत यामुळे रूग्णांना नाहक खर्च होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रूग्णालयात दाखल होणाऱ्या रूग्णांना मोफत औषधे देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०३-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) सर्व जीवरक्षक व जीवनावश्यक औषधे सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात उपलब्ध आहेत. दर करारावर उपलब्ध न झालेली औषधे रुग्णांच्या गरजेनुसार विहित मार्गाने स्थानिक खरेदी करुन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सदर रुग्णालयाकडून केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील १५४ शाळांमध्ये पिण्याचे पाणीसुध्दा उपलब्ध नसल्याबाबत**

**(२२) ११००२ (०९-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनावर बाहय घटकांचा परिणाम करणा-या भौतिक सुविधेसह जिल्ह्यातील १५४ शाळांमध्ये पिण्याचे पाणीसुध्दा उपलब्ध नसल्याने लाखो विद्यार्थ्यांना अर्ध्यावर शाळा सोडावी लागत असल्याने पटसंख्येसह गुणवत्तेवरही परिणाम होत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच बहुतांश शाळांमध्ये शाळा इमारत, मुख्याध्यापकाचे कक्ष, वर्ग खोल्या, शौचालय, पाणी, पाकगृह, संरक्षक भिंत आदि सुविधा जिल्ह्यातील नऊही तालुक्यातील १ हजार १२४ शाळांपैकी काही शाळांमध्ये उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा पुरविण्याबाबत लाखो रुपये खर्च होत असतांनाही उक्त सोई-सुविधा विद्यार्थांना न पुरविण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार यास जबाबदार असणा-या संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच उपरोक्त शाळांमध्ये तात्काळ सुविधा पुरविण्याबाबत शासनस्तरावर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) जिल्हयातील काही शाळामध्ये भौतिक सुविधा नाहीत व ९३ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही.

(२) जिल्हयातील, जिल्हा परिषदेच्या ११२४ शाळांपैकी काही शाळांमध्ये इमारत, मुख्याध्यापकांची खोली, मुलांचे स्वच्छतागृह, किचन शेड, संरक्षक भिंत यातील सुविधा नाहीत.

(३) ज्या शाळांमध्ये सोयी सुविधा नाहीत, तेथे सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर होणाऱ्या तरतूदीमधून निधी प्रस्तावित केला आहे. तसेच जिल्हा परिषद शाळांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेकडे मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यामध्ये अनेक जि.प.शाळा मोडकळीस आलेल्या व नादुरुस्त असल्याबाबत**

**(२३) ११५५१ (०७-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यामध्ये अनेक जि.प.शाळा मोडकळीस आलेल्या व नादुरुस्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या शाळा दुरुस्त करण्याबाबत किंवा त्या ठिकाणी नविन शाळा बांधण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या तरतूदीमधून ३६२ शाळा दुरुस्तीची कामे सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड (ता.जि.औरंगाबाद) येथील जि.प.शाळेच्या इमारतीच्या काही भागाची दुरावस्था झाल्याबाबत**

**(२४) १२५०४ (०८-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (ता.जि.औरंगाबाद) येथील जि.प.शाळेच्या इमारतीच्या काही भागाची दुरावस्था झाली असून या शाळेचा आडोसा म्हणून वापर करत तेथे अवैध कामे केली जात आहेत. पडझड झालेली ही इमारत जमीनदोस्त करणे गरजेचे असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन चौकशी करुन शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) होय.

(२) दूरावस्था झालेल्या वर्गखोल्या पाडून टाकण्यासंबंधी ठराव करणे इ. बाबत सदर शाळांच्या मुख्याध्यापकांकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अचलपुर तालुका (जि.अमरावती) येथील २४९ शाळांपैकी अनेक शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(२५) १३०१३ (०९-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना सोयीचे मोफत शिक्षण मिळावे यासाठी शासनाने सक्तीच्या कायद्यांतर्गत शाळांना १० पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक केले असून याकडे लक्ष देण्याची जबाबदारी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाची असली तरी पंचायत समिती याबाबत अनभिज्ञ असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचलपूर तालुक्यातील (जि.अमरावती) २४९ शाळांपैकी अनेक शाळांमध्ये वरिल पायाभूत सुविधा उपलब्ध नसुन या शाळा कायद्याचे उल्लंघन करीत असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०८-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथे विभागीय क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(२६) १३०७३ (०९-०४-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग व सोलापूर जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण हे कोल्हापूर असल्याने तेथे विभागीय क्रीडा संकुल उभारणीसाठी शासनाने सन २००६ च्या दरम्यान परवानगी देवून सन २००७ साली या क्रीडा संकुल बांधकामाचा प्रारंभ केला असतानाही सात वर्षे होवूनही सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम अद्याप प्रलंबित असून दोन-तीन वेळा विविध कारणांनी क्रीडा संकुलाचे काम बंद पडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विविध पक्ष संघटनांकडून झालेल्या आरोपांमुळे विभागीय सचिव व तत्कालीन पालकमंत्री यांनी बैठकीत क्रीडा संकुलाचे काम पुर्ण करण्याचे आदेश देवूनही अद्याप काम सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्रीडा संकुलाचे काम तात्काळ सुरु करुन ते पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०७-२०१५) :** (१), (२) व (३) कोल्हापूर येथे विभागीय क्रीडा संकुल उभारणीसाठी शासनाने दि.३० जानेवारी, २००९ नुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली होती. तसेच दि.१५ जुलै, २००९ नुसार कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिलेला होता. काही कारणास्तव सदर बांधकाम बंद होते. तथापि, विभागीय क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याने तत्कालीन पालकमंत्री यांनी दि.७.१.२०१० रोजी बैठक आयोजित करुन संकुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार विभागीय क्रीडा संकुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. तसेच दि.५.३.२०१५ रोजी पालकमंत्री कोल्हापूर यांचे शुभहस्ते ४०० मी. धावनमार्ग, फूटबॉल, टेनिस खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल क्रीडांगण या बाबींचा लोकार्पण सोहळा संपन्न झालेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या वर्गखोल्या सामाजिक संस्थांना कार्यासाठी देण्याबाबत**

**(२७) १३२३९ (०९-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या योजनेनुसार सन २००४ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्य प्राथमिक परिषदेने महानगरपालिका, औरंगाबाद क्षेत्रात वर्ग खोल्या बांधण्यासाठी ८४ लाख रूपये दिले होते, म.न.पा. औरंगाबादने त्यानुसार शहरात १६ ठिकाणी ४३ वर्ग खोल्या बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आता सर्व शिक्षा अभियान संपुष्टात आले असले, तरी म.न.पा.ची मालमत्ता असलेल्या या वर्गखोल्यांचा कोणताही वापर होत नसून या खोल्यामध्ये असलेली व या अभियानासाठी खरेदी केलेले साहित्यही तेथे नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) सद्यस्थितीत या सर्व वर्ग खोल्यांचा वापर होत नसल्याने औरंगाबाद शहरातील काही सामाजिक संस्थांना कार्यासाठी देण्याबाबत शासनाच्या शिक्षण विभागाने काही निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१७-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडून सन २००४-०५ मध्ये महानगरपालिका औरंगाबाद क्षेत्रात वर्गखोल्या बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत रु.५३.३० लक्ष मंजूर केले होते. त्यातून १२ शाळांमध्ये ३० वर्गखोल्यांची बांधकामे केली आहेत.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील विजापूर रोड, नेहरु नगर व मंद्रुप येथे क्रीडा संकूल उभारण्याबाबत

**(२८) १३४६६ (०९-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील विजापूर रोड, नेहरु नगर येथे क्रीडा संकुलासाठी जागा आरक्षित असून या जागेवर अद्याप क्रीडा संकुल उभारण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच उक्त मतदारसंघातील मंद्रुप येथे क्रीडा संकूल मंजूर असून सदरील क्रीडा संकुलाचे काम बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) (२) व (३) हे खरे नाही. दक्षिण सोलापूरमध्ये नेहरुनगर व मंद्रुप हे एकाच तालुक्यात आहेत.नेहरुनगरमध्ये जागा वन विभागाची असल्याने ती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे मंद्रुप येथे तालुका क्रीडा संकुलासाठी शासकीय जागा प्राप्त झाल्यामुळे मंद्रुप येथे दक्षिण सोलापूर तालुका क्रीडा संकुलाचे काम सुरु आहे. तसेच, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एका तालुक्यात एकच क्रीडा संकुल उभारता येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे प्रस्तावित काम सुरु होणेबाबत

**(२९) १३५०७ (०९-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे काम प्रस्तावित असून नोडल ऑफिस शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर यांनी सर जे.जे.कॉलेज ऑफ अर्किटेक्चर, मुंबई यांनी सादर केलेल्या आराखड्यानुसार रु ४५५.०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केल्याचे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी,चंद्रपूर यांना पत्र क्र. कपासू - २०१३ /२५० /प्र.क्र. २२२ ३मा-३, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ अन्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय महाविद्यालय व रुग्णालयातील जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी मोहल्ला चांद रै. भू.क्र. ५०३/१ आराजी ३१८.८२ हे.आर.पैकी १०.०० हे.आर जागा अभिहस्तांकित केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर येथील महिला रुग्णालयाच्या इमारतीमध्ये वैद्यकीय महाविद्यालये शैक्षणिक सत्र २०१५-१६ सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त इमारतीचे बांधकाम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणतः केंव्हा पर्यंत उक्त काम पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे
(३) केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी १०० विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्यात आलेली आहे.
(४) यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील सुमारे १६२८ अप्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नसल्याबाबत

**(३०) १३६३९ (०९-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ४० वर्षापूर्वी आदिवासी भागात ७ वी ते ११ वी पास झालेल्या उमेदवारांना शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली त्यावेळी डी.एड. पदवीधर अभ्यासक्रम पूर्ण करण्याविषयी कोणती अट नव्हती तसेच सेवानिवृत्त होईपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कोणताही पत्रव्यवहार झाला नाही परंतु शासनाने दिनांक २ मार्च, २००७ मध्ये जीआर काढून दिनांक १ जुलै, १९७२ नंतरच्या सुमारे १६२८ अप्रशिक्षित शिक्षकांचे सेवानिवृत्तीवेतन बंद केल्यामुळे उपजिविकेचे कोणतेही साधन नसल्याने त्यांची आर्थिक कुचंबना होत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) तसेच डहाणू (जि.पालघर) तालुक्यातीव व उरण (जि.रायगड) तालुक्यातील अप्रशिक्षित शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्याप्रमाणे सन २००४ ते २००८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेल्या अप्रशिक्षित शिक्षकांनी सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ घेतला तसा लाभ प्रश्न भाग (१) व (२) मधील कर्मचाऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा प्राथमिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीत राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याबाबत**

**(३१) १३६६० (०९-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीत परभणी जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात पहिल्या वर्गात दाखल होणाऱ्या १०० विद्यार्थ्यांपैकी जेमतेम ४३ विद्यार्थी कसेबसे दहावीपर्यंतचे शिक्षण घेत असून फक्त ५७ विद्यार्थी दहावी वर्गात प्रवेश करण्याअगोदरच शिक्षण अर्धवट सोडून बाहेर पडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व (२) होय.

(३ ) गळती कमी करण्यासाठी प्रवेश पंधरवड्याचे आयोजन करुन १०० टक्के पटनोंदणी करणे, पालकांचे प्रबोधन, शिक्षकांचे प्रबोधन, कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय, मुलींसाठी मोफत बस सेवा, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करणे, नवीन वर्ग सुरु करणे, शालेय पोषण आहार,मोफत पाठयपुस्तके इ.उपक्रम राबविण्यात येत आहेत.

राज्यातील शाळाबाहय विद्यार्थ्यांचे दि.०४/०७/२०१५ रोजी संपूर्ण राज्यात व्यापक सर्वेक्षण करण्यात आले असून, त्यात आढळलेल्या मुलांना त्यांच्या वयानुरुप नियमित शाळेत दाखल करण्यात येणार आहे. तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व सरल (Systematic Administrative Reforms for Achieving Learning by student ) इ. उपक्रम राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील अनेक तालुक्यातील व्यायामशाळांनी शासनाकडून अनुदान घेऊनही अद्याप व्यायामशाळा न बांधल्याबाबत**

**(३२) १३७८५ (१९-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील अनेक तालुक्यातील व्यायामशाळा फक्त कागदोपत्री दाखविल्या असून सदरील व्यायाम शाळांच्या बांधकामाकरीता शासनाकडून अनुदान घेऊन प्रत्यक्षात कोणतीही कामे न केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही, सोलापूर जिल्हयातील ११ तालुक्यातील ३४ संस्थांना दि. २६.०३.२००३ च्या शासन निर्णयानुसार सन २००६-०७ ते २०१४-१५ या कालावधीत अनुदान वितरीत करण्यात आले असून त्यापैकी ८ संस्थांनी अनुदानाचा विनियोग केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) शासकीय अनुदानाचा विनियोग न करणाऱ्या ८ संस्थावर जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्यामार्फत आवश्यक ती कारवाई सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुलनाच्या चौकशीबाबत**

**(३३) १४०४१ (०९-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी विभागीय क्रीडा संकुलनातील समस्यांचे बाबतीत चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) लोकप्रतिनिधी यांनी पत्रामध्ये उपस्थित केलेल्या ६ मुद्यांपैकी मु.क्र.४ मध्ये उपस्थित केल्यानुसार विद्युत अंकेक्षणाची कार्यवाही सुरु आहे. तसेच मुद्दा क्र. ६ मध्ये उपस्थित केल्यानुसार एका चौकीदाराकडून जागा खाली करुन घेण्यात आली असून दुसऱ्या चौकीदारास जागा खाली करण्याबाबत नोटिस बजावण्यात आली आहे. सदर प्रकरण औद्योगिक न्यायालय, अमरावती येथे प्रलंबित आहे. पत्रामधील अन्य मुद्दयांबाबतची कार्यवाही पुर्ण झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत**

**(३४) १४०८५ (०९-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील मिरज तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्यासाठी शासनाने १ कोटी रुपयांचा निधी देऊनही अधिका-यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे सदरील काम १ वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मिरज - पंढरपूर रोडवरील शासकीय महाविद्यालयाच्या समोरील जागा शासनाने क्रीडा विभागाकडे हस्तांतरीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी त्वरीत क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, सदरील तालुका क्रीडा संकुल केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जिल्हाधिकारी सांगली यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील सि.स.नं.१२/ब क्षेत्र १२.८६.६४ पैकी २ हेक्टर २० आर जमीन दिनांक ३०.११.२०१२ च्या आदेशान्वये तालुका क्रीडा समिती मिरज यांच्याकडे हस्तांतरीत केली आहे. सदर तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामाचे अंदाजपत्र व आराखडे यांना राज्य क्रीडा विकास समितीने दिनांक ४.८.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल (ता.जि.बुलढाणा) येथे महिला व पुरुषांसाठी अत्याधुनिक व्यायामशाळा उभारण्याबाबत**

**(३५) १४२०२ (०९-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा शहर (ता.जि.बुलढाणा) येथील मध्यवस्तीत जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुलाच्या भव्य वास्तुची उभारणी करण्यात आली असतानाही सदर ठिकाणी व्यायामशाळेची (जीम) उभारणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील शरीर सौष्ठवाची रुची असणा-या नवतरुण, महिला व पुरुषांच्या सोईकरीता सदर ठिकाणी अत्याधुनिक व्यायामशाळेची उभारणी करण्यात यावी अशी मागणी माजी लोकप्रतिनिधी, बुलढाणा यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी व जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरील व्यायामशाळा उभारणीबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१), (२) व (३) जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुलाच्या इमारतीत महिला व पुरुषांसाठी अत्याधुनिक सर्व सुविधायुक्त व्यायामशाळा (जीम) दिनांक १९/०५/२०१५ पासून सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी तालुक्यातील पाचगाव (जि.भंडारा) येथे नवोद्य विद्यालय स्थापन करण्याबाबत**

**(३६) १४२८६ (०९-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी तालुक्यातील पाचगाव (जि.भंडारा) येथे नवोदय विद्यालय स्थापन करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री, व सचिव, शालेय शिक्षण विभाग, यांना दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) (२) होय, हे खरे आहे.सदर योजना केंद्र शासनाची असून केंद्र शासनाच्या अधिपत्त्याखालील नवोदय विद्यालय समिती मार्फत राबविली जाते. सबब प्रस्तूत प्रकरणी जिल्हाधिकारी भंडारा व जवाहर नवोदय विद्यालय समिती, पश्चिम क्षेत्र यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील शाळांमध्ये सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३७) १४३०६ (०९-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील बहुतांशी जिल्हा परिषद, नगर पालिका, खासगी शाळांमध्ये स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, वीज इत्यादी सुविधा नसल्याची वस्तुस्थिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्हयातील सर्व शाळांमध्ये विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०८-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांदिवलीतील डहाणूकरवाडी येथील बालक विहार विद्यालय या मराठी शाळेत मुख्याध्यापक नसल्याने १० वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र न मिळाल्याबाबत

**(३८) १४४५७ (०९-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवलीतील (मुंबई उपनगर) डहाणूकरवाडी येथील बालक विहार विद्यालय या मराठी शाळेत मुख्याध्यापक नसल्याने १० वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र व शिक्षकांना २ महिने पगार मिळाला नसल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांचे पगार व १० वीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०८-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) बालक विहार विद्यालयातील अनियमिततेसंदर्भात संस्थेने प्रभारी मुख्याध्यापकास निलंबित केले आहे. तत्पूर्वी सदर प्रभारी मुख्याध्यापकास सक्तीच्या रजेवर पाठविल्याने वेतनदेयके सादर करण्यात आली नाही. तद्नंतर अन्य सेवाजेष्ठ शिक्षकास प्रभारी मुख्याध्यापक म्हणून स्वाक्षरी करण्याचे अधिकार दिल्याने सदर शाळेतील शिक्षकांचे वेतन माहे मार्च,२०१५ मध्ये अदा करण्यात आले आहे. तसेच १० वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र देण्यासंदर्भात कोणताही विलंब झालेला नाही.

---

## नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांमधील शौचालयाची अत्यंत दयनीय अवस्था असल्याबाबत

**(३९) १५२०४ (०८-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांमधील शौचालयाची अत्यंत दयनीय अवस्था असल्याबाबतचे वृत्त दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात जिल्हा पिरषदेच्या १५०० शाळा असून त्यापैकी अनेक शाळेमध्ये शौचालय उपलब्ध नाही तर काही शाळांमधील शौचालय पाण्याअभावी सुरु नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या निर्मल भारत योजनेअंतर्गत संपुर्ण गाव हागणदारी मुक्त करण्याचा योजनेला गती मिळण्याकरीता १२ हजार रुपयांचे वाढीव अनुदान जाहीर केले तरी सुध्दा योजना राबविण्यात अपयश आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजना ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांपर्यंत पोहचविण्यात अपयश येण्यामागची कारणे काय,
(५) नसल्यास, योजना राबविण्याकरिता काही ठोस निर्णय अंमलात आणार आहात काय,
(६) नसल्यास, ठोस योजना न राबविण्याची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये स्वच्छतागृह उपलब्ध असून त्यापैकी ५७ स्वच्छतागृहांची दुरुस्ती आवश्यक आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) व (६) दिनांक २ ऑक्टोबर,२०१४ पासून निर्मल भारत अभियानाचे स्वच्छ भारत मिशन असे नामांतर करण्यात आले असून निर्मल भारत अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालयासाठी देण्यात येणाऱ्या रु.५५००/-अनुदानात भरीव वाढ करुन रु.१२०००/- एवढे करण्यात आलेले आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत माहे ऑक्टोबर,२०१९ पर्यंत हगणदारीमुक्त भारत करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे.

---

**येरवड्यातील (जि.पुणे) नागपूर चाळीतील एसएनबीपी शाळेमध्ये निकालपत्र व ओळखपत्रासाठी चारशे-पाचशे रुपये आकरण्यात येत असल्याबाबत**

**(४०) १७६५४ (०६-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरवड्यातील (जि.पुणे) नागपूर चाळीतील एसएनबीपी शाळेमध्ये इयत्ता ४ थीचे शालेय निकालपत्र व ओळखपत्रासाठी चारशे -पाचशे रुपये आकारण्यात येत असल्याने त्याविरोधात पालकांत तीव्र नाराजी पसरली असल्याचे दिनांक १६ मे,२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने शाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व (२) सदर शाळेमध्ये निकालपत्र, संचयी नोंद पत्रक, सीसीई रेकॉर्डे या सर्व गोष्टींसाठी पाचशे रुपये घेतले जातात. गणवेश किंवा पुस्तके ठराविक दुकानातून, खरेदी करण्याची सक्ती करण्यात येत नाही. असे चौकशी अंती निदर्शनास आले आहे. याबाबत शाळेकडे अथवा शिक्षण मंडळ कार्यालयाकडे कोणत्याही पालकाची तक्रार आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबतची नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(४१) १८४५७ (०६-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याचे दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने प्राथमिक शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय,

(३) असल्यास, समितीने आपल्या अहवालात विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याच्यादृष्टीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत व या शिफारशींवर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) उक्त शिफारशींची अंमलबजावणी शासन केव्हांपासून करणार आहे,
(५) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) व (४) शिफरशींच्या अनुषंगाने दिनांक २१ जुलै,२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बर्डी (ता.अक्कलकुवा, जि.नंदूरबार) येथील किसन तडवी या आंतरराष्ट्रीय आशियाई युवा स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूस शासनाकडून योग्य तो सन्मान न मिळाल्याबाबत**

**(४२) २०५२२ (०६-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बर्डी (ता.अक्कलकुवा, जि.नंदूरबार) येथील किसन तडवी याने सन २०१५ च्या आंतरराष्ट्रीय आशियाई युवा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून महाराष्ट्राची शान राखली परंतु त्या धावपटूचा शासनाकडून योग्य सन्मान राखला गेला नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत यश संपादन करुनही शासनाकडून तडवी यास कोणतीही आर्थिक मदत व बक्षिस न देवून त्याची उपेक्षा केली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त खेळाडूस आगामी ऑलिम्पिक खेळात भाग घेण्यासाठी आर्थिक मदतीची गरज असतानाही सदरील खेळाडूस आर्थिक मदतीसह बक्षीस न देण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरील खेळाडूसह राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या इतरही पदक विजेत्या खेळाडूंचा योग्य तो सन्मान तसेच आर्थिक मदतीसह त्याचा गौरव करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१), (२) व (३) खेळाडूंना विविध खेळाच्या प्रशिक्षणाकरिता तसेच क्रीडा विषयक इतर बाबीसाठी राज्य क्रीडा विकास निधीमधून अर्थसहाय्य करण्यात येते. त्यानुसार कु.तडवी यांना दिनांक १२ जून २०१४ रोजी राज्य क्रीडा विकास निधीमधून पुढील स्पर्धेच्या तयारीसाठी रु.२.०० लाख इतके अर्थसहाय्य देण्यात आले आहे.
(४) ५ फेब्रुवारीख २०१४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिसे देऊन गौरविण्याची योजना

आहे. तथापि खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त केल्यानंतर त्याबाबतची माहिती संबंधित एकविध खेळाच्या राज्य संघटनेने प्राविण्य प्राप्त प्रमाणपत्रांसह १५ दिवसांच्या आत आयुक्त,क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे. कु.किसन तडवी यांच्या संदर्भातील अशा आशयाचा प्रस्ताव अद्यापि शासनास प्राप्त झाला नाही.

---

**राखीव जागांच्या मोफत प्रवेशासाठी सर्व शाळांना १५ दिवसांत शुल्क परतावा देण्याबाबत**

**(४३) २२२९५ (०६-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार राखीव जागांच्या मोफत प्रवेशासाठी सर्व शाळांना १५ दिवसांत शुल्क परतावा देण्याचे आश्वासन मा.शिक्षण मंत्री यांनी माहे मे, २०१५ मध्ये दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुल्क परताव्याचा निधी न दिल्याने आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टी असोसिएशनचे (मेस्टा) यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ नुसार २५% आरक्षणांतर्गत सन, २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये प्राथमिक शिक्षण (इ.१ ते ८) घेण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा शाळांना देण्यासाठी यन २०१४-१५ मध्ये रु.१९.५ कोटी वितरीत केले आहेत. सन २०१४-१५ या वर्षासाठी रु.१४.७० कोटी इतका निधी दिनांक १० ऑगस्ट २०१५ रोजी वितरीत केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विना अनुदानीत तत्वावरील शाळांना निधी मिळण्याबाबत**

**(४४) २२३४४ (०६-०८-२०१५). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित तत्वावरील शाळांना दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार कायम शब्द वगळून निधी उपलब्धतेनुसार अनुदान प्राप्त होईल असा निर्णय झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शिक्षक संचालक यांनी शालेय संस्थाकडून ऑनलाईन माहिती दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ पर्यंत मागविली होती तथापी वेबसाईट दिनांक २९ नोव्हेंबर २०१४ रोजी बंद करण्यात आल्याने व त्याकरीता दूसरी काही व्यवस्थाही नसल्याने अनेक संस्थाना आपली माहिती पाठवता आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच याबाबत मा.मुख्यमंत्री महोद्यांनी आदेश दिल्यानंतरही संबंधीत विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) दि. ३० नोव्हेंबर, २०१४ पर्यंत ऑनलाईन मुल्यांकनाची वेबसाईट सुरु होती.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) जिल्हा परिषदेच्या शाळांच्या छप्परासह वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(४५) २३५४३ (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) जिल्हा परिषदेच्या ४३ प्राथमिक तर २६ उच्च माध्यमिक शाळांच्या छप्परासह वर्ग खोल्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती व डागडुजी करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाने जिल्हा परिषद सिंधुदुर्गकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास जिल्हा परिषदेने मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन दिला आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शाळा सुरु होण्यापूर्वी उक्त शाळांच्या दुरुस्तीकरीता आवश्यक असणाऱ्या निधीच्या प्रस्तावास त्वरीत मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच प्रस्तावावर कार्यवाही करण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
कणकवली तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शाळा नाहीत. २२ प्राथमिक शाळा इमारत दुरुस्तीचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर झाले आहेत.
(२) जिल्हा परिषदेच्या निधीमधून पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्याने, सदर २२ प्राथमिक शाळा इमारत दुरुस्तीची कामे जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.
(३) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सदर कामांना मंजूरी दिल्यावर अनुदान उपलब्धतेनुसार प्रशासकिय मंजूरी देऊन शाळा इमारत दुरुस्त करणेची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**राज्यामध्ये तसेच राष्ट्रीय स्तरावर फ्री स्टाईल स्केटिंग या खेळात नैपुण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना क्रीडा संघटनेकडून अद्यापपर्यंत प्रमाणपत्र न दिल्याबाबत**

**(४६) २४४५१ (०६-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये फ्री स्टाईल स्केटिंग या खेळात राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर आतापर्यंत नैपुण्य मिळवणाऱ्या खेळाडुंना स्केटींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या क्रीडा संघटनेकडून किंवा क्रीडा विभागाकडून प्रदिर्घ कालावधीपासून प्रमाणपत्र न दिल्यामुळे शेकडो गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकिय योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त खेळातील खेळाडूंना सदरील प्रमाणपत्र त्वरीत वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१), (२) व (३) फ्री स्टाईल स्केटींग स्पर्धेचे आयोजन क्रीडा विभागाकडून करण्यात आलेले नाही. या संदर्भात स्केटींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या क्रीडा संघटनेकडून खुलासा मागविला असता संघटनेने फ्री स्टाईल स्केटींग या खेळ प्रकाराचे भारतात प्रथमच आयोजन करण्यात आल्याचे कळविले आहे. तसेच सदर खेळ प्रकाराचा दर्जा व गुणवत्ता याची सविस्तर पडताळणी राष्ट्रीय फेडरेशनद्वारे करण्यात आल्यानंतर संबंधित खेळाडूंना आवश्यक ती प्रमाणपत्रे जिल्हा संघटनांद्वारा वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण नविन शाळा इमारती बांधण्यासाठी व जुन्या शाळा इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४७) २४७७४ (१०-०८-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण नविन शाळा इमारती बांधण्यासाठी व जुन्या शाळा इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने किती रुपयांचा निधी मंजूर केला तसेच केंद्र शासनाकडून या कामासाठी किती निधी प्राप्त झाला आहे,
(२) अद्याप निधी प्राप्त झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) शासनाने राज्यातील ग्रामीण भागात नवीन शाळा इमारती बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांच्या इमारती बांधकामांसाठी व दुरुस्तीसाठी केंद्र शासनाकडून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निधी मंजूर करण्यात येतो. सन २०१५-१६ मध्ये २०० वर्गखोली बांधकामांसाठी रु.१३१३.४० लक्ष व शाळा दुरुस्ती अंतर्गत २९० प्राथमिक शाळा बांधकामांसाठी ५३९.२० लक्ष व २०९ उच्च प्राथमिक शाळा बांधकामांसाठी रु.४८६.८३ लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्य शासनाकडून स्वतंत्र निधी मंजूर केलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नवीन शाळा इमारती बांधकाम,केंद्र शासनाकडून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर निधीतून करण्यात येते. यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र निधी मंजूर केलेला नाही.

---

**सांगली जिल्हयासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अर्थात डाएट या संस्थेतील शिक्षकांचे वेतन गत चार महिनेपासून प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) २५६७५ (१०-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अर्थात डाएट या संस्थेतील शिक्षकांचे वेतन गत चार महिन्यांपासून रखडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेतील शिक्षकांचे मासिक वेतन वेळेवर न दिल्यामुळे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षकांचे वेतन तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सदय:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :**(१), (२), (३) व (४) सन २०१५-१६ पासून केंद्रशासनाने त्यांचा निधी तीन वेगवेगळया लेखाशीर्षाखाली (सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) उपलब्ध करुन दिला असून राज्य हिश्यासाठीसुध्दा तीन वेगवेगळे लेखाशीर्ष तयार करण्यात आले असून, त्यालेखाशीर्षात निधीची तरतूद करण्यासाठी विधीमंडळाची मान्यता आवश्यक असल्याने सदर तांत्रिक कारणामुळे डाएट संस्थेला वेतन देण्यास विलंब झाला. तथापि, दि.१०/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतनासाठीचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे १४६ शाळांना शासकीय मालकीची इमारत नसल्यामुळे भाड्याच्या खाजगी इमारतींमध्ये सदर शाळा भरविल्या जात असल्याबाबत

**(४९) २६३३५ (१०-०८-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे १४६ शाळांना शासकीय मालकीची इमारत नसल्यामुळे भाड्याच्या खाजगी इमारतींमध्ये सदर शाळा भरविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळा खाजगी इमारतींमध्ये भाड्याने असल्यामुळे भाड्यापोटी किती रक्कम खर्च करण्यात येते, यासंदर्भात शाळांकरिता शासकीय मालकीच्या इमारती बांधणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
रत्नागिरी जिल्हयातील १४६ शाळांपैकी १३७ शाळा भाडयाच्या जागेत भरविण्यात येतात.
(२) व (३) सन २०१४-१५ मध्ये रु.१४,२०,८९८/-इतका भाडयापोटी खर्च करण्यात आलेला आहे.
भाडयाच्या जागेत सुरु असलेल्या शाळांसाठी जमीन उपलब्ध करुन घेण्याचे व सर्व शिक्षा अभियान, जिल्हा वार्षिक योजना/जिल्हा परिषद सेस योजना याअंतर्गत वर्गखोली/इमारत उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

---

## सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार (सिव्हील हॉस्पीटल) रुग्णालयात झालेल्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी चौकशी समिती नेमण्याबाबत

**(५०) २६८९४ (३१-०७-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार (सिव्हील हॉस्पीटल) रुग्णालयात दिपक प्रकाश सकट या कामगाराचा दिनांक २६ मे, २०१५ रोजी संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कामगाराच्या दुर्दैवी मृत्युची एक उच्चस्तरीय वैदयकीय अधिका-यांसह अशासकीय डॉक्टरांची समिती गठीत करुन नि:पक्ष चौकशी करुन संबंधित डॉक्टर व कर्मचारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच सदर कुटुंबाला ५ लाख रुपये नुकसान भरपाई व कुटूंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी देण्याबाबतचे मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनाक ८ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त  निवेदनावर शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०४-२०१५) :** (१) श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे दिनांक २५/०५/२०१५ रोजी रुग्ण दिपक प्रकाश सकट यांना अपघात झाल्यामुळे, अस्थिव्यंगोपचार शास्त्र विभागात दाखल करण्यात आले होते.सदर रुग्णांवर दिनांक २६/०५/२०१५ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली असून, शस्त्रक्रियेनंतर दिनांक २७/०५/२०१५ रोजी उक्त रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सदर मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी संस्थेने चौकशी समिती गठीत केली होती. समितीच्या अहवालामध्ये सदर रुग्णाचा मृत्यू Fat Embolism Syndrome या दुर्मिळ पण गंभीर, विशेषत: हाडांच्या शस्त्रक्रियेपश्चात होणाऱ्या प्रचलित गुंतागुंती तसेच, डोक्याला व छातीला मार लागल्या कारणाने, प्रकृती अचानक गंभीर झाल्याने व योग्य ते सर्व उपचार करुन सुध्दा सदर उपचारांना रुग्ण प्रतिसाद न लाभल्याने निधन झाले असल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उक्त निवेदना संदर्भात क्षेत्रीय कार्यालयाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.